
ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 11 | ISSUE - 7 | MARCH - 2025

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# भारतीय समाजव्यवस्थेत स्त्रीचे बदलते स्थान, एक चिकित्सा



**अमन अंगद आडोळे**
**संशोधक विद्यार्थी**

**प्रा. डॉ. अनिल जामकर**
इतिहास विभाग प्रमुख
वसंतराव नाईक महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर

**प्रस्तावना -**

भारतीय समाजव्यवस्था ही भेदांनीयुक्त अशी आहे. जात, धर्म व वर्ग इ. प्रकारचे भेद भारतीय समाजव्यवस्थेत असल्याचे आपण जाणतो. निसर्गदत्त असलेल्या स्त्री-पुरुष भेद हा प्रत्येक मानसाला स्विकारणीयच आहे. परंतु यातही उच्चनीचता, श्रेष्ठ, कनिष्ठता निर्माण करुन पारंपारिक भारतीय वर्णव्यवस्थेने स्त्रीत्वास नेहमीच गौण स्थान दिलेले आहे. भारतामध्ये मातृप्रधान संस्कृती होती. त्यावेळी स्त्रीला सन्मानाचे स्थान दिलेले आहे. वेदकाळातही फार नाही पण अल्प का असेना स्त्रीला सन्मान होता. अथर्व वेदानुसार हे स्पष्ट आहे. की एके काळी स्त्री उपनयन या विधीला पात्र होती. जेनेकरुन मुलींचे ब्रह्मचर्य संपल्यानंतर ती विवाह योग्य होते. असे बोलल्या जात होते. श्रोत सूत्रानुसार हे स्पष्ट आहे की, स्त्रिया वेद मंत्रोच्चार करु शकत होत्या. पाणिनीचा अष्टाध्यायी हा या गोष्टीचा पुरावा आहे. पतंजलीच्या महाभाष्यावरुन दृष्टीस येते की, स्त्रिया ह्या शिक्षिका होत्या, त्यांनी विद्यार्थीनींना वेद शिकविले.

मनूपूर्व काळात भारतीय स्त्रियांनी ज्ञान आणि विद्वत्ते च्या जोरावर अत्युच्च शिखर गा ठले होते. असे असले तरी पुढील काळ स्त्रियासाठी अत्यंत हिन दर्जा चा झाला. याला कारणीभूत मनू असून या मनूने मनूस्मृतीच्या माध्यमातून समाजव्यवस्थे बरोबरच भारतीय स्त्रीला दुर्बल बनविण्यास महत्वाची भूमिका बजावली. ईर्ष्या किंवा द्वेष हा नेहमीच वरच्या स्थानी असणाऱ्या व्यक्तिमत्वाबद्दल होत असतो. आपण त्यांच्या इतके नसल्याची सल ही नेहमीच कुटकारस्थानाकडे धाव घेत असते. आणि अशाच प्रकारे मनुनेही स्त्रिया पुरुषा बरोबरच्या स्थानावर आघात करुन त्याला स्वलिखित कायद्याची जोड देवून समाजात स्त्रींचे स्थान डळमळीत केले, त्यामुळे स्त्रिया प्रगतीपासून अलिप्त होत्या.

डॉ. आंबेडकर लिहितात, ‘मनू बुध्दाच्या नंतर झालेला असला तरी जुन्या धर्मशास्त्रामध्ये अभिव्यक्त केलेला दृष्टीकोन त्याने प्रतिपादित केला. स्त्रियाबद्दलचा दृष्टीकोन भारतीय स्त्रियांना अपमान आणि त्यांच्यावर अन्याय करणारा आहे. एखाद्या यज्ञ प्रसंगी स्त्रियांच्या हातून तयार केलेले जेवन ब्राह्मण स्विकारणार नाही. अशा प्रकारचे अनेक अत्याचार बंधने मनूने स्त्रियावर लादली. त्याचाच पायंडा म्हणून आज सुध्दा स्त्रियांवर अनन्वीत अत्याचार होत आहेत. अशी व्यवस्था भारतीय समाजव्यवस्थे मध्ये स्त्रियांची होती.

समकालीन कालखंडात वा आजपर्यंत बऱ्याच विचारवंत व समाज सुधारकांनी खालील प्रमाणे स्त्रियांवर होणाऱ्या अन्याय अत्याचारा विरोधी व स्त्रियांना जागृत करण्यासाठी चळवळी, आंदोलने, सत्याग्रह केलेत.

**महात्मा जोतीबा फुले :**

मुलीनी शिकले पाहिजे त्यांना स्वातंत्र्य मिळावे असे विचार असणाऱ्या समाजसुधारकांपैकी महात्मा जोतीबा फुले होते. त्यांचा जन्म इ.स. १८२७ साली माळी जातीतील फुले घराण्यात झाला. त्यांचे मुळ नाव गोऱ्हे होते. मुलींच्या शिक्षणासाठी बुधवार पेठेतील भीडे वाड्यात इ. स. १९४२ साली पहिली शाळा सुरु केली. त्या शाळेच्या शिक्षिका म्हणून सावित्रीबाईंनी शिक्षिकेचे काम करण्यास सांगीतले. सावित्रीबाईंनी जोतीरांवाना साथ दिली. विधवास्त्रियांसाठी बालहत्या प्रतिबंधक गृह काढले. शतकानुशतके चालत आलेली स्त्रियांविषयी अन्याय करणारी राक्षसी परंपरा मोडित काढली.

## राजा राममोहन रॉय :

राजा राममोहन रॉय यांचा जन्म २२ मे १७७२ रोजी बंगालमधील राधानगर येथे झाला, वडीलांकडील सर्व मंडळी आधुनिक शिक्षण घेतलेली व मोठ्या हुद्यावर होती. तिबेड येथे जावून बौद्ध धर्माचा अभ्यास सुरु केला. परंतु तेथील एश्वर्य वादाची मते त्यांना पटली नाही. त्यांनी ती उघड बोलून दाखविली असता त्यांना हिंसेचा सामना करावा लागला. त्यावेळी स्थानकि स्त्रियांनी राजा राममोहन बाबूंचा जीव वाचविला या प्रसंगाने त्यांच्या मनात स्त्रियाविषयी आदरभाव उत्पन्न झाला. इ.स. १८९२ मध्ये थोरले बंधू जगमोहन यांचा मृत्यू झाला बळजबरीने त्यांच्या पत्नीस सती जाण्यास भाग पाडले. राममोहन यांनी विरोध केला. परंतु ते थांबवू शकले नाही. त्याकाळी सती जाण्याचे प्रमाण प्रचंड होते. त्यामुळे सरकारने १८२९ मध्ये या अमानुष प्रथेवर बंदी घातली. यावर राममोहन बाबूंनी ' Suttee and the shastras' असा एक लेख लिहिला. याला शास्त्राचा कुठलाही आधार नाही. हे दाखवून दिले.

शेवटी ४ डिसेंबर १८२९ रोजी राजा राममोहन रॉय आणि इतरांच्या प्रयत्नाला यश येवून सती प्रथा बंद करण्याविषयी विधेयक लॉर्ड विल्यम बेंस्टिक गर्व्हनर जनर, व्हायकाऊंट कॉबर मिअर कमांडर इन चीफ, डब्ल्यू. बी बेयले आणि सी. टी. मेटकाक यांच्या संयुक्त समितीने संमत केला.

## सावित्रीबाई फुले:

३ जानेवारी, १८३१ रोजी सातारा जिल्ह्यातील नायगाव येथे खंडोजी नेवासे पाटील यांच्या घरात सावित्री बाईंचा जन्म झाला. इ.स. १८४० मध्ये जोतीरावांशी लग्न झाले. अशिक्षित सावित्रीला जोतीबांनी घरीच शिक्षण दिले. १८४५ च्या शैक्षणिक वर्षात शिक्षिकेच्या ट्रेनिंग कोर्सच्या तीसऱ्या व १८४६ ला चौथ्या वर्गात प्रदेश घेतला. १८४७ मध्ये सावित्रीबाई एक उत्तम शिक्षिका म्हणून तयार झाल्या. जोतीरावांच्या खांद्याला खांदा लावून काम केले. दलित, पददलित, अस्पृश्य, अनाथ, विधवा स्त्रिया व पीडित या सर्वांना सवित्रीबाईंनी मायने जवळ केले. काशीबाई पोटी जन्मलेल्या यशवंतरा वला दत्तक घेवून आईपन स्वीकारले त्याला डॉक्टर केले. विधवा स्त्रियांचे केशवपन करण्याची प्रथा बंद करण्यासाठी त्यांनी पुण्यातील न्हाळ्यांना संपावर जाण्यास भाग पाडले आणि 'स्त्रियांचे केस कापून त्यांना विद्रुप करणार नाही' अशी शपथ घ्यायला लावली. बालहत्या प्रतिबंध-गृह स्थापन करुन इ.स. १८८४ पर्यंत ३५ ब्राह्मण विधवा स्त्रियांची बाळंतपणे पार पाडली. विधवा पुनर्विवाह मान्यता मिळवून अनेक तरुनांना विधवा स्त्रिया बरोबर विवाह करण्यास उद्युक्त केले.

## पेरियार रामास्वामी नायर :

पेरियार रामास्वामी यांचा जन्म दिनांक १७ सप्टेंबर १८७९ रोजी पश्चिम तमिळनाडू मधील इरोडेमध्ये एका परंपरावादी हिंदू (द्रविड धनगर ) कुटूंबात झाला. त्यांनी वर्णव्यवस्थेचा बहिष्कार केला. दक्षिण राज्यामध्ये त्यांच्या विचारांचा प्रभाव होता. तो असा त्यांनी बालविवाह संपुष्टात आणून विधवेस दुसरा विवाह करण्याच्या अधिकारासाठी आंदोलनेही केली.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म १४ एप्रिल, १८९१ रोजी मध्य प्रदेशातील इंदौरजवळील महू या गावी झाला. इ.स. १९०७ ला ते मॅट्रीकची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यांनी जातीयतेचे अनेक चटके सहन करत 'उच्च शिक्षित होवून अनेक पदव्या संपादन केल्या. स्त्रियांविषयी डॉ. बाबासाहेबांना आस्था आणि चिंता असायची ते स्त्री शिक्षणाचे पुरस्कर्ते होते. ते म्हणायचे जर तुम्हाला पुढील पीढी सुधारावयाची असेल तर मुलींना शिक्षण दिल्या शिवाय राहू नका. शिक्षण हे मानवी जीवनातील असे

साधन आहे की, त्यामुळे मानवाला आपली कार्यक्षमता सिद्ध करता येते. आपल्या भाषणातून व लेखनातून स्वत्वाची जाणीवही करुन देतात. शिक्षण घेणे हे पुरुषांचीच मक्तेदारी नाही. ती स्त्रियांनाही उपलब्ध करुन देण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा वाटा महत्त्वाचा ठरतो. त्यांनी स्त्रियांना स्वत्वाच्या जाणिवांचा व शिक्षण प्रणालीत समाविष्ट होण्याचा सला दिला.

भारतीय स्त्रीच्या हक्काचा जाहिरनामा हिंदू कोड बील डॉ. बाबासाहेबांनी भारतीय स्त्रीच्या हक्कासाठी निर्माण केलेला जाहिरनामाच होय. समग्र भारतीय हिंदू स्त्रियांना मालमत्तेचा हक्क, वारशाचे हक्क, पोटगीचे हक्क, घटस्फोटाचे हक्क, दत्तक विधानाचा हक्क, विवाहाचे हक्क, अज्ञान तत्व व पालकत्वाचे हक्क इत्यादी मिळावे. जे बील ४ वर्षे ८ महिना आणि २६ दिवस अवरात्र मेहनत करीत सदर विधेयक तयार केले होते. हे स्त्रीच्या जीवनाला कलाटने देणारे विधेयक होते. सतत संसदेच्या पटलावर मांडत मनुवाद्यांनी त्यास विरोध केला. शेवटी बिलाची वाताहत पाहून त्यांनी मंत्री पदाचा राजीनामा दिला. असा एकमेव केंद्रिय मंत्री म्हण्जे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते.

शेवटी घटना मसूदा समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांना मान मिळाला व स्त्री संबंधीच्या या समस्याग्रस्थ भागाला त्यांनी घटनेच्या माध्यमातून सोडवून कायमचीच स्त्रीला स्वबळावस्था प्राप्त करुन दिली आहे.

## उद्दिष्ट्ये :

१) प्राचीन काळातील स्त्रियांची अवस्था तपासणे
२) समाजसुधारकांचे स्त्री विषयक कार्य अभ्यासने
३) स्त्रियांच्या प्रगतीस बाधा ठरणाऱ्या चालीरिती समजून घेणे
४) स्त्री शिक्षणामुळे त्याचे देशावर झालेले सकारात्मक परिणामांचा मागवा घेणे.
५) अबला नारी सबळीकरणाची कारण मिमांसा तपासणे.

## भारतीय समाजात स्त्रीचे स्थान :

मनुस्मृती म्हणते, " स्त्रीला स्वातंत्र्य देवू नये. कारण ती स्वातंत्र्याच्या लायक नाही. तिला पूर्ण आयुष्य, आयुष्यातील प्रत्येक टप्प्यावर बंधनात ठेवावे. अवलंबिता ठेवावे, वस्त्रप्रावणे अलंकार शय्यासुखात अडवून ठेवावे. " अशी कटकारस्थाने धर्मशास्त्र करीत होती.

आर्यांनी भारतामध्ये येवून तीच्याशी विवाह केले. स्त्रीचे स्वातंत्र्य हिरावण्यासाठी त्यांनी सर्वतोपरी प्रयत्न केले. बालविवाह, बहुपत्नीकत्व, वैधव्यापालन, सतीची चाल, अशा विविध छळछावण्या तीच्यासाठी उभ्या केल्या. धर्मसत्ता, राजसत्ता, पुरुषसत्ता, यांनी संयुक्तपणे तीचे अस्तित्व, साम्राज्य उध्दवस्त केले. स्त्रीला हिन लेखन्याचे आचार-विचार संस्कृती, परंपरा, व्रतवैकल्य, उपासतापास आणि कर्मकांडाची निर्मिती केली. त्यांच्याशी विवाह करुन तीला गुलाम करणे हा प्रमुख हेतू दिसून येतो. विवाह याचा अर्थच वाहून नेणे' असा आहे. म्हणजे वधूला वरगृही वाहून नेणे.

मनुस्मृती (९-२६) "प्रजनार्थ स्त्रिया: किंवा प्रनार्थ स्त्रिया: सृष्टा: म्हणजेच स्त्रियाचा वापर उपभोग्य पुत्रजन्माचे यंत्र म्हणून करण्यात आला. पती रोगी, बाहेरख्याली कुरुप, आंधळा-पांगळा असला तरी स्त्रीने त्याचा द्वेष करु नये कारण पती हा स्त्रिच्या दृष्टीने देंव असतो. असे 'शंख' म्हणतो. तीने दासी प्रमाणे राहावे. पती नंतर जेवण करावे. हळू बोलावे, जनसमूहात हसू नये, पतीपेंक्षा वरच्या आसनावर बसू नये. अशी अवस्था स्त्रीची करुन ठेवली होती. १८, १९, २१ च्या श्लोकातून मनूनी असे मांडले की पतीने दुसरे लग्न केल्याने बाहेर पडलेल्या स्त्रि विषयी मनुस्मृती शिक्षा सांगते हे अशी - तिला ताबडतोब बांधून किंवा तिच्या माहेरी सोडून तिचा त्याग करावा.

शिवाय सतीची चाल- पतीचे निधन झाल्या कुठल्याही वयातील स्त्रीला पतीच्या सरनाला बांधून तिला जाळले जात असे. अशा अनेक विध कुप्रथा स्त्रियाप्रति अस्तित्वात होत्या.

स्त्री अन्याय अत्याचारा विरुद्ध विचारवंत, समाजसुधारकांनी चळवळी उभारल्या त्यामध्ये महात्माफुले- स्त्रिशिक्षणाचे जनक, राजा राममोहन रॉय - सतीची चाल बंद करण्यास लढले. सावित्रीबाई फुले - आद्य स्त्रि शिक्षिका, केशवपन करण्याची प्रथा ज्यांनी बंद केली. पॅरियार रामास्वामी - बालविवाह व पुनर्विवाह अधिकारासाठी आंदोलने केलीत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदु कोड बिल तयार करुन स्त्रियांचे सर्व हक्क व अधिकार प्राप्त करुन देण्याचा प्रयत्न केला.

उपरोक्त विचारवंत व समाज सुधारक यांच्या प्रयत्नांना कालांतराने यश आल्यामुळे आजची स्त्री गुलामगिरीतून मुक्त झाली आणि मोकळा श्वास घेवून जगत आहे.

## भारतीय स्त्रियांच्या उत्थानाची फलश्रृती :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हयातभर जे स्त्री उन्नतीचे कार्य केले. त्याला वैचारिक, सैद्धांतीक, अधिष्ठान प्राप्त करुन दिलेत. त्यामुळे आजची भारतीय स्त्री सक्षम झाल्याचे आपणास दिसून येते. यातून डॉ. आंबेडकरांचाच गौरव होतो, असे नाही तर, स्त्री-मुक्ती लढ्यातील सर्व योद्धयाचेही महत्त्व तितकेच वाढले आहे. मात्र सुधारक विचारवंतानी यथाशक्ती रचलेल्या स्त्री सबळीकरणाच्या पायाला कळस चढविण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. ते वावगे ठरनार नाही.

आज भारतीय स्त्री ही जीवनाच्या प्रत्येक वळणावर अधिक ताठपणे उभी राहतांना दिसते. शैक्षणिक, धार्मिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतीक व आर्थिक क्षेत्रासह ती माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातही अगदी खंबीरतेने वावरत आहे. त्याचे कारण संविधानाने तिला बहाल केलेले अधिकार होय. त्याची काही उदाहरणे खालील प्रमाणे देता येतील. सध्या आपण पाहतो ऐतिहासिक कामगिरी केलेल्या थोर महिलांची राजकीय कला, क्रीडा, शिक्षण, पर्यटन सिनेसृष्टी, उद्योग व्यवसाय, कृषि, सामाजिक कार्य, गणिततज्ञ, वैज्ञानिक, IAS, पत्रकार अशा कर्तृत्ववान महिलांची नावे सांगता येतील.

### विविध क्षेत्रातील भारतीय कर्तृत्वावान महिला

| अनु. क्र | नाव | क्षेत्र | पहिल्या महिला पद |
|---|---|---|---|
| १. | आनंदीबाई गोपाळ जोशी | आरोग्य | डॉक्टर |
| २. | अवनी चतुर्वेदी | विमान | फायटर पायलट |
| ३. | इंदिरा गांधी | राजकीय | पहिल्या पंतप्रधान |
| ४. | कल्पना चावला | अंतराळ | अंतराळवीर |
| ५. | दुर्गाबाई कामत | चित्रपट | अभिनेत्री |
| ६. | प्रिया जिंघन | भारतीय सैन्य | सैनिक |
| ७. | पी. व्ही. सिंधू | क्रिडा | बॅडमिंटन |
| ८. | अदिती पंत | पर्यटन | गिर्यारोहक (अंटार्टिका) |
| ९. | बचेंद्री पाल | क्रिडा | गिर्यारोहक (एव्हरेस्ट) |
| १०. | रिटाफिरीया पॉल | सौंदर्य स्पर्धा | मिस वर्ल्ड |
| ११. | हिना सिंधू | क्रिडा (शुटींग) | शुटींग |
| १२. | मिताली  राज | क्रिडा | क्रिकेटपटू |
| १३ . | होमी वरारावाला | प्रसार माध्यम | छायाचित्रकार |
| १४. | सायना नेहवाल | क्रिडा | बॅडमिंटन (ऑलंपिक) |
| १५. | फतिमा बेबी | न्यायालय | न्यायाधीश |
| १६. | दीपा मलिक | क्रिडा | कुस्तीपटू |
| १७. | पी. टी. उषा. | क्रिडा | ओलंपिक धावपटू |

## समारोप :

प्राचीन काळातील स्त्रियांची अवस्था, त्यांचे समाजातील स्थान, रुढी परंपरेत जखडलेल्या, कुजलेल्या विचारसरणीने स्त्रीला एक दासी आणि उपभोग्य वस्तू म्हणून तीचा वापर केला आणि कोणत्याही प्रकारचा अधिकार, हक्क नव्हता. अशा स्थितीत स्त्रिया विषयी आस्था असणारे विचारवंत व समाजसेवकांनी स्त्रीमुक्तीचे लढे उभारुन स्त्रीला दास्य, गुलामगिरीतून काढण्याचा प्रयत्न केला. तरी सुध्दा काही प्रथा व रीतिरिवाज स्त्रियांच्या प्रगतीस अडसर ठरणाऱ्यावर मात करुन कर्तृत्ववान स्त्रिया तयार झाल्यात. त्यांना शिक्षणाचा अधिकार, बालविवाह बंदी, पुर्नविवाहास मान्यता, वारसा समान हक्क, पुरुषाच्या

बरोबरीने काम करण्याचा अधिकार प्राप्त झाल्यामुळे आज महिला विविध क्षेत्रात अग्रेसर झालेल्या पहायला मिळतात. त्यांच्यामुळे देशाची प्रगती तर झालीच शिवाय भारताचे नाव साता समुद्रापलीकडे सुद्धा मोठ्या आदराने घेतले जाते. आंतरराष्ट्रीय संबंध सलोख्याचे झालेत.

समाजसेवक व विचारवंतानी भारतीय स्त्रीच्या सबलीकरणातील योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. स्त्रीच्या दास्य विमोचनासाठी त्यांनी कृतीशील प्रयत्न केलेले प्रत्ययास येते. भारतीय स्त्री सबळ व्हावी म्हणून भाषण, लेखनातून स्त्री उद्धराचा विचार मांडला. म्हणून आज स्त्रियांची झालेली प्रगती ही डोळे दिपून टाकाव्यासारखी आहे.

## संदर्भ सूची

१) नरके हरी व इतर, २००३ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे, खंड-१८, १, २ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे चरित्र व प्रकाशन समिती, मुंबई, पृ. ८६
२) पेरियार रामास्वामी आत्मभान चळवळ http://en.m.wikipedia.orgwiki
३) नवले अरुण २०१९, भारतीय क्रांतीकारक आणि समाजसुधारक, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, पृ. १४६
४) कित्ता, पृ. क्र. १४८
५) राजा राममोहन रॉय-https:www.aisiakshare.com/node/324
६) श्री. कैलास चंन्द्र सेठ - १९९५, बाबासाहेब, डॉ. आंबेडकरसंपूर्ण वाङमय खंड ७ पृ. ३३२
७) डॉ. प्रतिभा अहिरे- २०२३ डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हिंदु कोड बिल- सुर्यमुद्रा प्रकाशन, नांदेड, पृ. २९
८) डॉ. भास्कर पाटील- २०२३, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सबलीकरण, सुर्यमुद्रा प्रकाशन, नांदेड पृ. ६
९) कित्ता- पृ. ७